*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक ४६२/२०२१/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. राकेश पी. सोमवंशी, रा. ४१, उत्तरायण शिल्प, श्री. रघुवीर नगर, खोडाई देवी रोड, ता.जि. नंदुरबार. | प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग धुळे, ता.जि. धुळे. | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग धुळे, ता.जि. धुळे. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक – ०६/११/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १३/१०/२०२० | १३/१०/२०२० | २२/०१/२०२१ | २८/१२/२०२० | ३१/१२/२०२० | ----- |

अपिलार्थी यांनी दि. १०/०२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " प्रथम अपिलाचे कामकाज चालले नाही साक्षांकित माहिती देण्याचे आदेश झाले नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे इ.स. २०२०-२१ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१. निविदा सुचना क्र.१४ इ.स. २०२०-२१ आश्रमशाळा इमारतीच्या तातडीच्या दुरुस्ती कामाची बी-१ निविदा एकुण ४ कामे तता निविदा सुचना क्र. १५ आश्रमशाळा इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाची बी-१ निविदा एकुण २ कामे इ. कामांच्या पारित झालेल्या कार्यारंभ आदेशांच्या १-१ झेरॉक्स प्रती.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तीवादावरून असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक सा.बां. (आदिवासी) विभाग, धुळे यांनी दि.२२/०१/२०२१ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना दि. २९/०१/२०२१ रोजी माहितीच्या अवलोकनासाठी उपस्थित राहणेबाबत कळविले आहे. असे सुनावणीदरम्यान स्पष्ट करण्यात आले आहे.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां. (आदिवासी) विभाग, धुळे यांनी अपिलार्थी यांच्या दि. ३१/१२/२०२० रोजी दाखल केलेल्या अपिल अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केले आहे. सदर अपिल अर्जाचे अवलोकन करुन अपिलार्थी यांनी गैरहजर राहण्याबाबचे कळविले आहे. परंतु मला अपिलाची पुन्हा सुनावणी करण्याबाबत मागणी केलेली नाही किंवा पुढील अपिलाची तारखेची मागणी केलेली नाही. त्यानुसार असा निर्णय देण्यात येतो की, अपिलार्थी यांना माहिती घेण्याची इच्छा नाही. तरी त्यांचा अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

३) सुनावणीदरम्याचा उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर ही बाब स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मुळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तथापि, अपिलार्थी यांनी प्रथम अपिल दाखल केल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना माहितीच्या अवलोकनाची संधी दिली आहे. मात्र अपिलार्थी यांनी निविदा सुचना क्र.१४ व १५ अंतर्गत केलेल्या कामाच्या कार्यारंभ आदेशाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील गुणवत्तेवर निर्णय पारीत केलेला नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, सा.बां. (आदिवासी) विभाग, धुळे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२/०१/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, सा.बां. (आदिवासी) विभाग, धुळे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ४६२/२०२१/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहेत.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रथम लिपीक, सा.बां.(आदिवासी) विभाग, धुळे, ता.जि.धुळे

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र. रा-२८४० 22 JUL 2024